# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त ) (ISO:9001:2008)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,चौथा मजला,
49,खेरवाडी,बांद्रा(पूर्व),मुंबई-400051

दूरध्वनीक्र.26472122/1255/ फॅक्स-91-022-6513980

email : director@msbte.com Web : www.msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/का.क्र.-50/समतुल्यता/2011/4848 दिनाक:- 17 JUN 2011

प्रति,
संचालक,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
विद्यापीठ भवन,मुकुंदनगर,
गुलटेकडी,पुणे-411037.

**विषय:** शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्षाच्या समकक्षता प्रमाणपत्राबाबत.

**संदर्भ :** आपले कार्यालयाचा प्रस्ताव No.ADM/2010/2393 dt. 8.3.2010

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भांकीत पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मंडळ कार्यालयाच्या समतुल्यता समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार आपले विद्यापिठात चालविण्यात येणाऱ्या खाली नमुद केलेल्या अभ्यासक्रमांच्या सन 2011-2012 या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षासाठी खालील अटींच्या अधिन राहून समकक्षता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव |
|---|---|
| 1. | Diploma in Mechanical Engineering |
| 2. | Diploma in Computer Engineering |
| 3. | Diploma in Electronics & Tele Communication Engg |

अटी :-

1) सदर पदविका अभ्यासक्रमांसाठीचे विद्यार्थ्यांचे प्रवेश हे AICTE/DTE व राज्य शासनाच्या निकषा प्रमाणेच करण्यात यावे.

2) सदर पदविका अभ्यासक्रम हे विद्यापीठास पुणे येथील मुख्य कार्यालयाच्या आवारातच सुरु करणे बंधनकारक राहिल.

3) सदर पदविका अभ्यासक्रम हे विद्यापीठाच्या संलग्न कोणत्याही स्टडी सेंटर अथवा संस्थेत चालविण्यात येऊ नये.

4) सदर पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमता 60 प्रति अभ्यासक्रम या पेक्षा जास्त राहणार नाही.

5) मंडळाने दिलेली पदविका अभ्यासक्रमांची समतुल्यता ही फक्त प्रथम वर्षाकरीताच मर्यादित राहील. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षासाठी समतुल्यता समितीच्या तपासणीनंतरच्या शिफारशीवर अवलंबून राहील.

6) उपरोक्त पदविका अभ्यासक्रम हे मंडळाच्या मानकानुसार राबविणे बंधनकारक असेल.

7) उपरोक्त पदविका अभ्यासक्रमांना फक्त प्रथम वर्षासाठी मंडळाने समतुल्यता दिलेली असून दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अभ्यासक्रम राबविण्याची प्रक्रीया समतुल्यता समितीचे निरीक्षण झाल्यानंतर शिफारशी नुसार देण्यात येईल, याची कल्पना प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना देण्यात यावी.

आपला

(जी.बी.धनोकार)
संचालक
म.रा.तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई-५१.

प्रत – 1.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई – ४०० ००१.
2. सचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई – ५१.
3. उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे.